**SNBP INTERNATIONAL & SR. SECONDARY SCHOOL, CHIKHALI, PUNE**
**Affiliation No. 1130703**
**TERM -II (2024-25) ANSEWRKEY**

| GRADE : V | SUBJECT: MARATHI | DATE : 7.03.2025 | TIME : 3 HRS | MARKS : 60 |
|---|---|---|---|---|

**विभाग 'अ' गद्य आकलन**

**प्रश्न १.उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा.** **(5QX1M=5M)**

माझे गाव खूप सुंदर आणि निसर्गरम्य आहे .गावाच्या सीमारेषेवर एक लहानसा तलाव आहे ,जिथे सकाळी आणि संध्याकाळी पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू येतो .आमच्या गावात एक मोठी शाळा ,एक वाचनालय आणि एक ग्रामदैवताचे मंदिर आहे .लोक शेती करून आपली उपजीविका करतात .शेतात तांदूळ ,गहू ,हरभरा आणि भाजीपाला घेतला जातो . सणासुदीला गावात मोठी जत्रा भरते .त्या वेळी गावकऱ्यांचे घर पाहुण्यांनी भरलेले असते .वडिलधारी मंडळी गावच्या चौकात बसून आपापसात गप्पा मारतात .लहान मुले मैदानी खेळ खेळतात .आमच्या गावातील लोक अतिशय मेहनती आणि प्रेमळ आहेत .मला माझे गाव खूप आवडते.

**प्रश्न:**

१. गावाच्या सीमारेषेवर काय आहे? **उत्तर –** गावाच्या सीमारेषेवर एक लहानसा तलाव आहे.
२. गावातील लोक कोणता व्यवसाय करतात ? **उत्तर –** लोक शेती करून आपली उपजीविका करतात.
३. गावात कोणकोणत्या गोष्टी आहेत ? **उत्तर–** गावात एक मोठी शाळा ,एक वाचनालय आणि एक ग्रामदैवताचे मंदिर आहे.
४. लहान मुले कोणते खेळ खेळतात ? **उत्तर –** लहान मुले मैदानी खेळ खेळतात.
५. उताऱ्यानुसार गावातील लोक कसे आहेत ? **उत्तर –** आमच्या गावातील लोक अतिशय मेहनती आणि प्रेमळ आहेत.

**प्रश्न २.योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा . (कोणतेही ५)** **(5QX1M=5M)**

( पळण्याची , अभ्यासाची , सायकल , इंधनाची , गोंधळ , हातात )

१. सायकलच्या वापरामुळे **इंधनाची** बचत होते.

२. वर्षभर अशी यांची स्पर्धा चालते **पळण्याची**.

३. **सायकल** हे एक प्रवासाचे वाहन आहे.

४. तू तुझ्या **अभ्यासाची** एक जागा निवड.

५. एका मागून एक येतात **हातात** हात धरून.

६. मनात नुसता **गोंधळ** होत असतो.

**प्रश्न ३.जोड्या लावा.** **(6QX1M=6M)**

| 'अ' गट | 'उत्तर' | 'ब' गट |
|---|---|---|
| १. सन | वर्षगणना | विधीप्रमाणे |
| २. घरोघरी | प्रत्येक घरी | चांगला दिवस(उत्सव) |
| ३. सण | चांगला दिवस(उत्सव) | जन्मभर |
| ४. यथाविधी | विधीप्रमाणे | वर्षगणना |
| ५. अवस्था | स्थिती | प्रत्येक घरी |
| ६. आजन्म | जन्मभर | स्थिती |

**प्रश्न ४.एका वाक्यात उत्तरे लिहा.( कोणतेही ५)** **(5QX1M=5M)**

१. शाळेतून आल्यावर एकदम अबोल होऊन कोण बसते?
**उत्तर –** शाळेतून आल्यावर एकदम अबोल होऊन नीरजा बसते.
२. रागीट कोण आहे ?
**उत्तर –** रागीट एप्रिल आहे.
३. कशाच्या वापरामुळे वातावरणात दूषित वायू मिसळला जातो?
**उत्तर –** पेट्रोल डिझेलच्या वापरामुळे निघणाऱ्या धुरामुळे वातावरणात मध्ये दूषित वायू मिसळला जातो.
४. शेवटी नंबर कोणाचा येतो ?
**उत्तर –** शेवटी नंबर डिसेंबर चा येतो.
५. सायकलच्या वापरामुळे कोणते फायदे होतात .
**उत्तर –** सायकल वापरामुळे प्रदूषण होणार नाही, पैशाची, इंधनाची बचत होईल शिवाय आरोग्यही उत्तम राहील!
६. आजीच्या मनातील काळजीचे भले मोठे ओझे केव्हा कमी झाले?
**उत्तर –** नीरजाचा गोंधळ कळाल्यावर आजीच्या मनातील काळजीचे भले मोठे ओझे कमी झाले.

**प्रश्न ५.अंक अक्षरात लिहा.(कोणतेही४)** **(4QX1M=4M)**

अ) ९६ - शहाण्णव आ) ८३ - त्र्याऐंशी इ) ७१ -एकाहत्तर

ई) ६८ - अडुसष्ट उ) ८० - ऐंशी ऊ) ९९ – नव्याण्णव

**प्रश्न ६.कोण कोणास म्हणाले ते लिहा.** **(3QX1M=3M)**

१. "आजी ,मी फार गोंधळून गेली आहे." **उत्तर –** नीरजा आजीला म्हणाली.

२. "आता तुम्हीच नीरजा सोबत बोला." **उत्तर –** नीरजची आई आजीला म्हणाली.

३. "मला सांग नीरजा तू अभ्यास कसा करतेस ?" **उत्तर –** आजी नीरजला म्हणाली.

**प्रश्न ७.पुढीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** **(1QX2M=2M)**

१. आजीने कशाप्रकारे नीरजच्या मनातील अभ्यासाचा बागुलबुवा पळवून लावला ?
**उत्तर –** विद्यार्थ्यांच्या प्रतीसादानुसार.
२. वर्षातील बारा महिन्यांची नावे लिहा.
**उत्तर –** १)जानेवारी २)फेब्रुवारी ३)मार्च ४)एप्रिल ५) मे ६)जून ७)जुलै ८)ऑगस्ट ९)सप्टेंबर १०)ऑक्टोबर ११)नोव्हेंबर १२)डिसेंबर

**विभाग 'ब' व्याकरण विभाग**

**प्रश्न ८.योग्य पर्याय निवडून शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** **(3QX1M=3M)**
( कृतज्ञ , दूरदर्शी , साक्षर , संशोधक , कृतघ्न )
१. लिहिता वाचता येणारा. **उत्तर – साक्षर**

२. केलेल्या उपकाराची जाणीव न ठेवणारा .**उत्तर – कृतघ्न**

३. दूरवरचा विचार करणारा. **उत्तर – दूरदर्शी**

**प्रश्न ९.समानार्थी शब्द लिहा.** **(2QX1M=2M)**

१. हात = हस्त ,कर २. दूषित =अस्वच्छ,खराब,त्रासदायक

**प्रश्न १०.विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(2QX1M=2M)**

१. महाग X स्वस्त २. अबोल X बोलका

**प्रश्न ११.यमक जुळणारे शब्द लिहा.** **(2QX1M=2M)**

१. धरून = करून २. चिअर = ईयर

**प्रश्न १२.वचन बदला.** **(2QX1M=2M)**

१. खिडक्या = खिडकी २. वाहन = वाहने

**प्रश्न १३.लिंग बदला.** **(2QX1M=2M)**

१. आजी = आजोबा २. नात = नातू

**प्रश्न १४.काळ ओळखून लिहा.( वर्तमानकाळ ,भूतकाळ ,भविष्यकाळ)** **(2QX1M=2M)**

१. राघव अभ्यास करतो . **वर्तमानकाळ**

२. आम्ही सुट्टीत गावाला जाणार. **भविष्यकाळ**

**प्रश्न १५.पुढील वाक्यांमध्ये योग्य विरामचिन्हे वापरून वाक्य लिहा.** **(3QX1M=3M)**

१. सफरचंद खाली जमिनीवरच का पडते

**उत्तर –** सफरचंद खाली जमिनीवरच का पडते?

२. अरे वा राधा तू खूप छान रांगोळी काढलीस

**उत्तर –** अरे वा ! राधा तू खूप छान रांगोळी काढलीस.

३. मला आंबा पेरू सफरचंद केळी चिकू ही फळे आवडतात

**उत्तर –** मला आंबा, पेरू, सफरचंद, केळी, चिकू ही फळे आवडतात.

**प्रश्न १६.दिलेल्या शब्दाचा वापर करून वाक्य तयार करा.** **(2QX1M=2M)**

१. मितभाषी ( विद्यार्थ्यांच्या प्रतीसादानुसार.)

२. लबाड ( विद्यार्थ्यांच्या प्रतीसादानुसार.)

**विभाग 'क' लेखन विभाग**

**प्रश्न १७. खाली दिलेल्या कोणत्याही एका विषयावर आठ ते दहा ओळीत निबंध लिहा.** **(1QX5M=5M)**

१. माझी सायकल किंवा २. माझी आजी

( विद्यार्थ्यांच्या प्रतीसादानुसार.)

**प्रश्न १८.दिलेल्या चित्राचे निरीक्षण करून आठ ते दहा ओळीत वर्णन लिहा.** **(1QX5M=5M)**

( विद्यार्थ्यांच्या  प्रतीसादानुसार.)

